# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः04.02.2025** **वारःमंगळवार**

1. संसदेच्या दोन्ही सभागृहांत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक प्रस्तावावर चर्चेला सुरुवात
2. केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यात रेल्वेसाठी 23 हजार 778 कोटी रुपयांची विक्रमी तरतूद
3. जीबीएस आजार संसर्गजन्य नाही; परिस्थिती नियंत्रणात असल्याचा केंद्रीय आरोग्य मंत्र्यांचा निर्वाळा आणि
4. गडचिरोलीमध्ये चार नक्षलवाद्यांची पोलिसांसमोर शरणागती

**<u>लोकसभा-राज्यसभा-अभिभाषण चर्चा</u>**

संसदेच्या दोन्ही सभागृहांत काल राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक प्रस्तावावर चर्चेला सुरुवात झाली. लोकसभेत भाजपाचे रामवीर सिंह बिधुरी यांनी आभार प्रस्ताव मांडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने केलेल्या कामांची आणि लोककल्याणकारी योजनांची माहिति त्यांनी दिली. तत्पूर्वी कामकाज सुरू होताच महाकुंभमेळ्यातील चेंगराचेंगरीच्या घटनेवरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. या दुर्घटनेची सभागृहात चर्चा करावी, मृतांची नावे सादर करावीत, अशी मागणी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केली. राष्ट्रपतींचं भाषण गेल्या वर्षांसारखेच होतं असं सांगत, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सरकारवर विविध मुद्दयावरून टीका केली; देशातील बेरोजगारीचा मुद्दा उपस्थित करत बेरोजगारीची समस्या सोडवण्यात सरकार अपयशी ठरल्याचं गांधी म्हणाले.

राज्यसभेत भाजपा खासदार किरण चौधरी यांनी चर्चेला सुरुवात केली. शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण पावलं उचलल्याचं ते म्हणाले. राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी बेरोजगारी, महागाई आणि रुपयाची घसरण हे मुद्दे या चर्चेत उपस्थित केले. राज्यसभेत देखील महाकुंभमेळयामधील दुर्घटनेच्या मुद्द्यावरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी घोषणाबाजी केली. या आणि इतर मुद्यावर आलेले स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळून लावले. त्याच्या निषेधार्थ कॉंग्रेस, समाजवादी पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, राष्ट्रीय जनता दल आणि अन्य पक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केला.

**<u>रेल्वे बजेट</u>**

2025-26 या आर्थिक वर्षासाठीच्या केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यात रेल्वेसाठी एकंदर 23 हजार 778 कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केल्याची माहिती रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल दूरस्थ पद्धतीने घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. ते म्हणाले....

राज्यात एकंदर 1 लाख 70 हजार कोटी रुपयांची कामं सुरू असल्याचंही वैष्णव यांनी सांगितलं. अमृत स्थानक योजनेअंतर्गत राज्यात 132 नवी स्थानकं विकसित केली जाणार आहेत, 2014 पासून आत्तापर्यंत राज्यात 2 हजार 105 किलोमीटर लांबीचे नवे रेल्वेमार्ग तयार करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. रेल्वे प्रवास सुरक्षित करण्यासाठी एकंदर 10 हजार लोकोमोटिव्ह गाड्यांवर 'कवच' यंत्रणा बसवण्याचं काम सुरू असून सहा वर्षांमध्ये ही यंत्रणा पूर्णत्वाला नेण्याचं ध्येय आहे, असंही वैष्णव यांनी नमूद केलं. या आर्थिक वर्षात 50 नव्या नमो भारत गाड्या, 100 नव्या अमृत भारत गाड्या आणि 200 नव्या वंदे भारत गाड्या सुरू करण्याची योजना असल्याचंही वैष्णव म्हणाले.

**कोकण रेल्वे-रत्नागिरी**

कोकण रेल्वे ही आता हरित रेल्वे झाली आहे अशी माहिती कोकण रेल्वेचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक संतोषकुमार झा यांनी काल रत्नागिरीत पत्रकार परिषदेत बोलताना दिली. ते म्हणाले..

गेल्या चार वर्षांत 10 नवीन स्थानकं, आणि आठ नवे मार्ग तयार करण्यात आले; 27 किलोमीटर मार्गाचं दुहेरीकरण आणि 640 किलोमीटरचं विद्युतीकरण करण्यात आलं असं झा यांनी सांगितलं.

**मुख्यमंत्री-आवास योजना**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण मधील दुसऱ्या टप्प्यात राज्यासाठी 19 लाख 66 हजार घरकुलांचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे. आतापर्यंत 16 लाख 81 हजार 531 घरकुलांना मंजुरी देण्यात आली आहे. सामाजिक उत्तरदायित्व निधीची मदत घेऊन या कामांना गती देण्याचे आणि घरकुलांचं उद्दिष्ट पूर्ण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. केंद्र आणि राज्य शासनाच्या सामाजिक क्षेत्रातील महत्वाकांक्षी योजनांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. शहरी घरकुल योजना, जल जीवन मिशन या कामांनाही गती द्यावी, तसंच आयुष्मान कार्ड वितरणातील त्रुटी दूर करून कार्डाचं वाटप पूर्ण करण्याचे निर्देशही त्यांनी या बैठकीत दिले.

**अजितपवार-कृषि**

कृषी क्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात 'ए आय'चा वापर करण्यासाठी सहकार विभागासमवेत समन्वय करून प्रकल्पाची व्यवहार्यता तपासून घेण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल दिले. या विषयावर झालेल्या एका बैठकीत ते बोलत होते. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे पीक आरोग्याचं विश्लेषण, मातीतील कार्बनचं प्रमाण तसंच मृदा आरोग्य, पिकांवरील कीड आणि रोगांचा प्रादुर्भाव ओळखणे शक्य होणार आहे.

**जे.पी.नड्डा**

महाराष्ट्रात विशेष करून पुणे शहरात जी बी एस रुगाणची संख्या वाढत असली तरी हा आजार संसर्गजन्य नाही, त्यामुळे परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. असा निर्वाळा केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी दिला आहे. या आजारावर लागणारी औषधे राज्यात पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचं नड्डा यांनी काल  दूरस्थ माध्यमातून घेतलेल्या बैठकीत सांगितलं. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश अबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. यावेळी जे. पी. नड्डा यांनी जीबीएस आजारासंबंधी सविस्तर आढावा घेत विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना महत्वपूर्ण सूचना केल्या.

**जीबीएस**

दरम्यान राज्यात आत्तापर्यंत जीबीएस आजाराचे 163 संशयित रुग्ण आढळून आले आहेत. त्यापैकी 127 रुग्णांना जीबीएस आजार झाल्याचं तपासातून निश्चित झालं आहे. 5 संशयित रुग्णांचा मृत्यू झाला आहे. काल 5 नवीन रुग्ण आढळून आले आहेत.

हा आजार वाढण्याची कारणे शोधण्यासाठी पशूसंवर्धन विभागाच्या वतीने संशोधन करण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिसन पवार यांनी दिली आहे. दरम्यान, काल अहिल्यानगर शहरात या आजाराचा एक संशयित रुग्ण आढळून आला असून त्याला पुढील तपासणीसाठी पुण्याच्या ससून रुग्णालयात पाठवण्यात आलं आहे अशी माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागोराव चव्हाण यांनी दिली.

**महाकुंभ-अमृतस्नान**

महाकुंभ मेळाव्यात कालच्या वसंत पंचमीच्या औचित्याने काल तिसरं अमृतस्नान झालं. काल 2 कोटी 33 लाखांहून अधिक भाविकांनी तसंच अनेक आखाड्यांमधील साधू, महंत तसंच भाविकांनी त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केलं.

**पक्षीमित्र संमेलन समारोप-अहिल्यानगर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील शेवगाव इथे आयोजित करण्यात आलेल्या 37व्या पक्षीमित्र संमेलनाचा समारोप काल झाला. पक्षीमित्र संघटनेच्या माध्यमातून पक्षीसंवर्धन, निसर्ग आणि पर्यावरणाचं संतुलन राखलं जात आहे हे उल्लेखनीय असून, याबाबतचे अनेक प्रकल्प मार्गी लावण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करायला हवा असं मत यावेळी व्यक्त करण्यात आलं. या दोन दिवसीय संमेलनात पक्षी संवर्धनाशी संबंधीत विविध मुद्यांवर चर्चा करण्यात आली. तसंच जायकवाडी इथे पक्षी निरीक्षण करण्यात आलं.

**गडचिरोली-नक्षली-आत्मसमर्पण**

गडचिरोलीत काल दोन नक्षली दाम्पत्यांनी, जिल्हा पोलिस आणि केंद्रीय राखीव दलापुढे शरणागती पत्करली. यात एक विभागीय समिती सदस्य, एक एसीएम आणि दोन दलम सदस्यांचा समावेश आहे. या नक्षलवाद्यांवर सुमारे 28 लाख रुपयांचं बक्षीस होतं. अशोक सडमेक आणि वनिता दोहे तसंच साधू मोहंदा आणि मुन्नी कोरसा अशी या नक्षली दांपत्त्यांची नावं आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

दरम्यान गडचिरोलीत पोलिसांनी अवघ्या एका दिवसात पोलिस ठाणं सुरू केलं आहे. मुख्यालयापासून 200 किलोमीटर अंतरावर नेलगुंदामध्ये दीड हजारापेक्षा जास्त पोलिसांनी ही कामगिरी केली आहे. नक्षलवाद्यांचं प्रशिक्षण स्थळ तसंच दोन राज्यांच्या सीमावर्ती क्षेत्रात हा भाग आहे. या कामगिरीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांचं अभिनंदन केलं आहे.

**कुस्ती-मुंबई**

महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत गैरवर्तन केल्याबद्दल दोन कुस्तीगीरांवर बंदी घालण्याचा निर्णय राज्य कुस्तीगीर परिषदेनं घेतला आहे. अहिल्यानगर इथं रविवारी या स्पर्धेचा समारोप झाला. महेंद्र गायकवाड आणि शिवराज राक्षे या दोन कुस्तीगीरांनी पंचांशी वाद घातला; त्यामुळे पुढची 3 वर्ष त्यांना कोणत्याही कुस्ती स्पर्धेत भाग घेता येणार नाही.

**क्रीडा-मुंबई**

38व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत काल सातव्या दिवशी महाराष्ट्रासह विविध संघांनी चमकदार कामगिरी केली. सेना दल संघानं 22 तर कर्नाटकानं 19 सुवर्ण पदकं मिळवली आहेत. महाराष्ट्र 15 सुवर्ण पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. मात्र 26 रौप्य आणि 20 कास्य पदकं जिंकून महाराष्ट्रानं सर्वाधिक 61 पदकं जिंकली आहेत.

**हवामान**

राज्याच्या बहुतांश भागात किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत काहीशी वाढ झाली आहे. येत्या 24 तासात राज्यात हवामान कोरडं राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.